# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.05.2025** **वार-मंगळवार**

---

**10 वी निकाल**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा म्हणजेच इयत्ता दहावीचा निकाल आज मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पुण्यात जाहीर केला. यंदा या परीक्षेत 94 पूर्णांक 10 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, गेल्यावर्षी पेक्षा यंदा 1 पूर्णांक 71 टक्क्यांनी निकालात घट झाली असून यावर्षीही मुलींच्या उत्तीर्णतेचं प्रमाण सर्वाधिक आहे. पुणे विभागाचा निकाल 94 पूर्णांक 81 टक्के इतका आहे.

**ई लर्निंग**

पुणे महापालिकेच्या राजीव गांधी ई - लर्निंग स्कुलनं राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या निकालात यंदाही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

**12 वी समकक्ष**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोरवाडी इथल्या आयटीआय प्रशिक्षणार्थ्यांनी 12समकक्ष परीक्षेत घवघवीत यश मिळवलं असून यंदा आयटीआय चा निकाल 90 पूर्णांक 70 टक्के लागला आहे.

**अभियोग्यता परीक्षा**

राज्यात शिक्षक भरतीसाठी घेतल्या जाणार्या शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी परीक्षेसाठी अर्ज करण्यास 14 मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली आहे. पात्र उमेदवारांनी अधिक माहितीसाठी www.mscepune.in या संकेतस्थळाला भेट द्यावी असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

**जयतु शंभू**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती प्रथमच राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत आयोजित करण्यात येत आहे. या निमित्ताने पुरंदर तालुक्यातील आचार्य अत्रे सभागृह सासवड इथं 14 मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर आधारित 'जयतु शंभू' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये शंभरहून अधिक लोककलाकार आपली कला सादर करणार आहेत.

**आदिवासी चित्रपट महो.**

बहुरंग, पुणे आयोजित 18वा आंतरराष्ट्रीय आदिवासी चित्रपट महोत्सव 19 आणि  20 मे रोजी पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. माडीया गोंड लोक शिरस्त्राण म्हणून वापरत असलेलं ‘शीरमोर’ हे यंदाच्या महोत्सवाचं बोधचिन्ह आहे, अशी माहिती बहुरंग, पुण्याचे अध्यक्ष डॉ. कुंडलिक केदारी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. दरवर्षी हा महोत्सव राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे आयोजित केला जातो. यामध्ये देश-परदेशातील लघुपटांसह ‘आम्ही आदिवासींची लेकरे’ हे आदिवासी गीत दाखवलं जाणार आहे.

**धीरज घाटे**

भारतीय जनता पक्षाच्या पुणे शहराध्यक्षपदी धीरज घाटे यांची फेरनिवड करण्यात आली आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घाटे यांची निवड महत्वपूर्ण मानली जात आहे.

**शेतकरी नोंदणी**

राज्यात शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या ‘ॲग्रिस्टॅक’ योजनेंतर्गत जिल्ह्यात 12 मे पर्यंत 5 लाख 13 हजार 601 शेतकर्यांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे संबंधित शेतकर्यांना शासनाच्या विविध योजनांचा सुलभरीत्या लाभ मिळणार आहे. ‘ॲलग्रिस्टॅक’च्या नोंदणीत आत्तापर्यंत अहिल्यानगर पहिल्या, तर पुणे जिल्हा तिसर्या क्रमांकावर आला आहे.

**उपप्रादेशिक परिवहन**

वाहनांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहन चोरी सारखे गैरप्रकार रोखण्यासाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट्स म्हणजे  एच एस आरपी  बंधनकारक करण्यात आलं आहे . ही नंबर प्लेट सर्व प्रकारच्या वाहनांसाठी अनिवार्य आहे. अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरित या नंबर प्लेट्स बसवून घ्याव्यात,  असं पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी सांगितले .

**इंडिफ्लाय करंडक’**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं इंडिफ्लाय करंडक अजिंक्यपद 13 वर्षांखालील 25-25 षटकांच्या क्रिकेट स्पर्धेचं येवलेवाडी इथं आयोजन करण्यात आलं आहे. स्पर्धेचं हे पहिलंच वर्ष असून या आंतरक्लब स्पर्धेत 13 वर्षाखालील वयोगटातील एकूण 10 निमंत्रित संघ सहभागी झाले आहेत.

**खेलो इंडिया**

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत आज महाराष्ट्र संघान पदकांच शतक झळकावत अव्वल स्थान पटकावलं. आत्तापर्यंत 41 सुवर्णा सह 32 रौप्य आणि 28 कांस्य पदकाची कमाई करीत एकूण 101 पदकाचा पल्ला महाराष्ट्राने गाठला आहे.

**पाणी कारवाई**

पुणे शहरात पिण्याच्या पाण्याचा अपव्यय करणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून सुधारणा न झाल्यास नळजोडणी तोडली जाईल असा इशारा पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी आज पत्रकारांशी संवाद साधतान दिला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारी मेघगर्जनेसह पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. आज कमाल तापमान 32 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 21 पूर्णांक 40 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं उद्या कमाल तापमानात वाढ संभवत असून हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमधे. नमस्कार.**